# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- १२३-२२ दिनांक :- ०२/०५/२०२२

## ATM मशीनमध्ये स्कीमर बसवुन ATM कार्डचे क्लोनिंग करुन पैसे लुटणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश करुन ४ गुन्हेगारांना अटक- माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक ३०/०४/२०२२ रोजी एक संशईत इसम स्किमर मशीन घेवून येणार असल्याची गोपनीय माहिती माणिकपुर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अंमलदार यांना प्राप्त झाल्याने सदर पथकाने वसई पश्चिम येथे सापळा रचुन संशईत नामे १) सौरभ उज्वलकुमार यादव रा.गोविंद एकता सोसायटी, पाचपायरी गेट, जिवदानी रोड विरार पुर्व ता. वसई जि. पालघर मुळ रा. मायाबिघा पो. किनारचट्टी, वझीरगंज ठाणे, जि. गया राज्य-बिहार यास ताब्यात घेवुन त्याचेकडुन १ स्किमर जप्त केले. त्याचेकडे सखोल चौकशी केली असता त्याचे इतर साथीदार हे विरार येथे असल्याची माहिती मिळाल्याने संशईत नामे २) धनराज केशो पासवान मुळ रा. ग्राम धुंदू पो. गुरपा, थाना-फत्तेपुर जि. गया रा-बिहार ३) पवनकुमार अखिलेश पासवान मुळ रा. ग्राम नवखाप पो. धिवर, थाना फत्तेपुर जि. गया, राज्य-बिहार व ४) राकेश कारु चौधरी रा ग्राम भवारी खुर्द, पो. हेमतपुर थाना फत्तेपुर जि. गया राज्य-बिहार या तिघांना ताब्यात घेण्यात आले. सदर इसमांकडे सखोल चौकशी केली असता ते आपसात संगणमत करुन विविध बँकेच्या ए.टी.एम. मशीन, हॉटेल्स मधील वेटर, पेट्रोल पंपावरील कामगार यांना हाताशी धरुन स्कीमर मशीन मध्ये ए.टी.एम. कार्ड स्वॉईप करुन त्याआधारे संबधीत ए.टी.एम. कार्ड धारकाचे बँक खात्याची माहिती प्राप्त करुन सदर माहितीवरुन लॅपटॉप, ए.टि.एम. क्लोनर व सॉफ्टवेअरचा वापर करुन बनावट ए.टि.एम. कार्ड तयार करत व त्याद्वारे ए.टि.एम. मशीनमधुन सर्वसामान्य जनतेच्या बँक खात्यातुन पैसे काढुन लोकांची आर्थिक फसवणुक करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर आरोपीतांकडून एकुण ३ लॅपटॉप, ४ ए.टी.एम. कार्ड क्लोनर, ८ ए.टी.एम. स्कीमर मशीन, ५ मोबाईल फोन, विवीध बँकांचे एकुण १०३ ए.टी.एम. कार्ड, २ नोटबुक, रोख रक्कम व १ मोटरसायकल असा एकुण रु. ४,१४,०००/- किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरबाबत माणिकपुर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १६०/२०२२ कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ भा.दं.वि. सह कलम ६६(क), ६६(ड) माहिती तंत्रज्ञान सुधारीत अधिनियम २००८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन चारही आरोपींना दिनांक ३०/०४/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे व सदर गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, श्री. प्रदीप गिरीधर, सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राजेश ओझा, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, माणिकपुर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी स.पो.नि. श्री. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.उ.नि. रोहिणी डोके, पो.ह. शैलेश पाटिल, पो.ह. शामेश चंदनशिवे, पो.ह. धनंजय चौधरी, पो.शि. गोपाळ कोळेकर व पो.शि. प्रविण कांदे यांनी केलेली आहे.